भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०५/२०१७

**१) घराच्या समोरील दाराचा कोंडा वाकवुन बेडरुमधील टिनाचे पेटीतील सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ३०/०४/२०१७ ते ०४/०५/२०१७ दरम्यान यातील फिर्यादी संदिप लंकेश्वर कुकडे वय ३२ वर्ष, रा. नेहरु वार्ड बेला हे परीवारासह लग्नानिमीत्त बाहेर गावी घराला लॉक करुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कोंडा वाकवुन दार उघडुन आत प्रवेश करुन बेड रुम मध्ये ठेवलेल्या टिनाचे पेटीतील एक सोन्याचा गोप वजन ७ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन ५ ग्रॅम व नगदी १४०००/–रु. असा एकुण ४६०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे अनोळखी इसमास धडक मारुन गंभिर जखमी होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०५/२०१७ ते ०४/०५/२०१७ चे रात्र दरम्यान यातील अनोळखी मृतक इसम वय अंदाजे ३० वर्ष, वयोगटातील यास कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालवुन धडक मारल्याने अनोळखी मृतक यास कपाळावर, गृप्तगांवर, डावे पायावर मार लागुन गंभिर जखमी होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी आनंदराव बाजीराव बाळबुधे वय ५७ वर्ष, रा. कोटरपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४ (अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन भांडण करुन, ड्रेसीगवर आपटल्याने काचेचा मार लागुन जखमी झाल्याने व मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०५/२०१७ चे २०.०० वा दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती मिरा दवलत वरंबे वय ४७ वर्ष, रा. मांगली हिचा भाचा मोरेश्वर साखरकर हा आई व पत्नी सोबत भांडण करीत असतांना आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ याने तेथे येवुन फिर्यादीचा मुलगा रवी दौलत आरोपीचा भाऊ आरोपी क्र. २ अनील बावनकर हा तेथे आला 'रव्या बाहेर निघ' म्हणुन फिर्यादीचे मुलाचे टिशर्ट धरुन ड्रेसींग टेंबलावर आपटले त्यामुळे तो खाली पडला व त्याचे पायाचे डावे घुडग्यास व हातावर मार लागुन जखमी झाला त्यामुळे मधात फिर्यादी ही आडवी झाली असता हात धरुन मुरकडुन ड्रेसींगवर आपटल्याने डावे डोळयाचे खाली ड्रेसींगच्या काचेचा मार लागुन जखमी झाल्याने व मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. पवनी येथे कलम ३२४,५०६,३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) दारु पिवुन शिवीगाळ व भांडण करुन थापडबुक्यानें व काठीने जखमी करुन व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/०५/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील आरोपी हा दारु पिवुन फिर्यादीचे घरी जावुन फिर्यादीस शिवीगाळ केली तेव्हा फिर्यादीने आरोपीस तु शिवीगाळ करुन नको माझे घरुन निघुन जा असे हटकले असता आरोपीने फिर्यादीचे घराचे छपरीमध्ये ठेवलेली खाट व शर्ट पॅन्ट अंगणात फेकले व भांडण करुन फिर्यादीस थापड बुक्यांनी व काठीने हातावर, छातीवर, व दोनही डोळयाचे खाली मारुन जखमी करुन दोन्ही डोळयाचे खाली सुजन आलेली असल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी किशोर चिंतामन वाघाये वय ६० वर्ष, रा. केसलवाडा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) महिद्रा मॅक्स गाडी चालकाने निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल चालकाला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०५/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सिहोरा कडुन तुमसर कडे जाणारी मोटार सायकल क्र. एमएच ३६ एफ ८१४६ चा चालक सुरेन्द्र भाऊराव गिरडकर वय २६ वर्ष, रा. उमरवाडा यांचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. डोंगरे यांचे चौकशी वरुन पोस्टे. सिहोरा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) अवैध दारु /जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. गोबरवाही व अडयाळ येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हा.भ.दारू किंमती १५००/–रु, व जुगारातुन किंमती २३५/–रु. असा एकुण किंमती १,७३५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.